सर्वोत्कृष्ठ संस्थेसाठी कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने दोन वेळा सन्मानित,
मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे 'स्वच्छ कॅम्पस रँकिंग २०१९' मानांकन प्राप्त

ज्ञानगंगा घरोघरी

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

(नॅक मानांकित 'अ' श्रेणी)

'ज्ञानगंगोत्री', गोवर्धन, गंगापूर धरणाजवळ, नाशिक - ४२२२२२

स्कूल ऑफ ऑनलाईन लर्निंग

C207 मूल्यशिक्षणाची मूलतत्त्वे: मूलभूत

माहितीपुस्तिका

शैक्षणिक सत्र जानेवारी २०२५

विद्यापीठ गीत

एक प्रतिज्ञा असे आमुची ज्ञानाची साधना ।

चिरंतन ज्ञानाची साधना ।

ज्ञान हेच संजीवन साऱ्या जगताच्या जीवना ।। धृ ।।

ज्योत जागवू सुजाणतेची सकलांच्या अंतरी।

तीच निवारील पटल तमाचे प्रभात सूर्यापरी।

ज्ञानच देऊळ, ज्ञानच दैवत, प्रगतीच्या पूजना ॥ १ ॥

नव्या युगाचा नव्या जगाचा ज्ञान धर्म आहे।

त्यातच आमुच्या उजळ उद्याचे आश्वासन राहे।

मुक्त करील तो परंपरेच्या बंदिघरातुन मना ॥ २ ॥

हाच मंत्र नेईल आम्हाला दिव्य भविष्याकडे।

न्यायनितीचे पाऊल जेथे भेदाशी ना अडे।

जे जे मंगल पावन त्याची जेथे आराधना ॥ ३ ॥

- कुसुमाग्रज

माहितीपुस्तिका निर्मिती :

इमरटस प्रो. कविता साळुंके
संचालक,
स्कूल ऑफ ऑनलाईन लर्निंग
य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक

डॉ. विद्यादेवी बागुल
शैक्षणिक संयोजक
स्कूल ऑफ ऑनलाईन लर्निंग
य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक

डॉ.सचिन पोरे
शैक्षणिक संयोजक
प्रा. राम ताकवले संशोधन आणि विकसन केंद्र, य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक

© यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

प्रथम प्रकाशन : जानेवारी २०२५
अक्षर जुळणी : डॉ. विद्यादेवी बागुल
प्रकाशक : श्री. दिलीप भरड, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक - ४२२२२२

अनुक्रमणिका

१) विद्यापीठ परिचय ४

२) विद्याशाखा परिचय ४

३) शिक्षणक्रमाविषयी माहिती..... ४-५

४) शिक्षणक्रमाची उद्दिष्टे..... .....५

५) प्रवेश पात्रता..... ५

६) शिक्षणक्रमाची संरचना..... ..... ५

७) शिक्षणक्रमाचा कालावधी..... ..... ५

८) शिक्षणक्रमाचे माध्यम ५

९) शिक्षणक्रम शुल्क ६

१०) अभ्यासक्रम ६

११) अध्ययनसाहित्य.. ..... ६

१२) शिक्षणक्रम अंमलबजावणी प्रक्रिया.....६-७

१३) मूल्यमापन पद्धती ७

१४) उत्तीर्णतेचे नियम ७

१५) शिक्षणक्रम कॅलेंडर ८

१६) प्लॅटफॉर्म..... ८

१७) अधिक माहितीसाठी संपर्क ८-९

१. विद्यापीठ परिचय

महाराष्ट्र शासनाने मुक्त विद्यापीठाची स्थापना 'यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ कायदा १९८९' अन्वये १ जुलै १९८९ रोजी केली. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्य असून, विद्यापीठाचे मुख्यालय नाशिक येथे आहे. शिक्षणाची आवड असलेल्या अनेक व्यक्तींना स्वत:ची नोकरी, व्यवसाय वा उद्योग सांभाळून स्वयं-अध्ययनाद्वारे पुढे शिक्षण घेता यावे, या हेतूने मुक्त विद्यापीठाची स्थापना झाली. मुक्त विद्यापीठाचे ध्येय लोक विद्यापीठ बनणे आहे. मुक्त विद्यापीठाच्या कार्याची दखल घेऊन २००२ व २०१९ या वर्षी Commonwealth of Learning, Canada या संस्थेचा 'Award of Excellence for Institutional Achievement' हा पुरस्कार विद्यापीठाला मिळाला. दोन वेळा असा पुरस्कार मिळणारे हे जगातील एकमेव विद्यापीठ आहे. तसेच नॅककडून विद्यापीठाला 'ए' श्रेणी प्राप्त झाली आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची शिक्षणपद्धती दूरशिक्षणाची (Distance Education) आहे. विद्यापीठाने राज्यभर विखुरलेल्या अभ्यासकेंद्रांमार्फत विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा शिक्षण क्षेत्रातील वाढता उपयोग आणि अध्ययनार्थीच्या काळानुसार गरजा लक्षात घेऊन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने दिनांक १ ऑगस्ट २०२३ रोजी स्कूल ऑफ ऑनलाईन विद्याशाखेची स्थापना केली.

२. विद्याशाखा परिचय

बदलत्या काळासोबत तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शिक्षणप्रक्रिया सुलभ करण्याच्या उद्देशाने दि. १ ऑगस्ट २०२३ रोजी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात स्कूल ऑफ ऑनलाईन लर्निंग या नाविन्यपूर्ण विद्याशाखेची स्थापना झाली. सर्व स्तरांतील विद्यार्थ्यांना प्रवेशयोग्य, लवचिक आणि उच्च-गुणवत्तेचे शिक्षण प्रदान करणे, त्यांना आजच्या गतिमान जगात उत्कृष्ट बनवण्यासाठी आवश्यक कौशल्ये आणि ज्ञानाने सक्षम करणे हे या विद्याशाखेचे ध्येय आहे.

ऑनलाईन शिक्षण ही इंटरनेट वापरून संगणक, मोबाईल आणि लॅपटॉप यासारख्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांद्वारे कौशल्ये आणि ज्ञान मिळवण्याची प्रक्रिया आहे. शिक्षणाची ही पद्धत शिक्षकांना किंवा मार्गदर्शकांना संबंधित कौशल्ये आणि ज्ञान प्रदान करून विद्यार्थ्यांना अधिक लवचिक आणि कार्यक्षमतेने शिक्षण घेण्यास मदत करते.

जे विद्यार्थी विविध कारणांमुळे वर्गात उपस्थित राहू शकत नाहीत, ते ऑनलाईन शिक्षणाद्वारे स्वत:च्या ठिकाणी व सवडीनुसार शिकू शकतात. हा दृष्टीकोन तंत्रज्ञानाच्या आव्हानांवर मात करून २४ तास अभ्यासासाठी सुविधा देतो. ऑनलाईन शिक्षणाला अलीकडच्या काळात महत्त्व प्राप्त झाले आहे. अनेक व्यक्ती विविध अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेऊन त्यांच्या व्यावसायिक विकास करत आहेत. यासाठी स्कूल ऑफ ऑनलाईन लर्निंग सातत्याने प्रयत्नशील आहे.

३. शिक्षणक्रमाविषयी माहिती

अध्ययनार्थीच्या सर्वांगीण विकासासाठी अभ्यासक्रमात मूलभूत विषयांबरोबर मूल्यांचा देखील समावेश असणे अत्यावश्यक आहे. शिक्षणामुळे अध्ययनार्थीचे चारित्र्य घडले पाहिजे ज्यातून ते नीतिवान, तर्कशुध्द,

सहानुभूतीशील आणि सहदय बनतील. परिणामी ते लाभदायी आणि समाधानकारक रोजगार मिळविण्यासाठीही तयार होतील (राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०). मूल्य शिक्षणातून विद्यार्थी जीवनकौशल्ये आत्मसात करून आपले जीवन संपन्न करू शकतो. मूल्य ही संपन्न जीवन जगण्यासाठी कसे उपयुक्त आहेत याची जाणीव प्रस्तुत शिक्षणक्रमातून होईल. तसेच मूल्यांचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी सक्षम तज्ज्ञ तयार होतील. मूल्यशिक्षण रुजविण्यासाठी अप्रत्यक्षरित्या विद्यार्थ्यांपर्यंत कसे पोहोचावे यासंदर्भात अध्ययनार्थींना सदरील शिक्षणक्रम दिशादर्शक ठरणारा आहे.

४. शिक्षणक्रमाची उद्दिष्टे

1. मूल्यशिक्षणासंदर्भात शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करून देणे.
2. समाजात मूल्य प्रसाराचे कार्य करण्यासाठी सक्षम तज्ज्ञ तयार करणे.
3. शिक्षकांना मूल्यशिक्षण देण्यासाठी समर्थ करणे.

५. प्रवेश पात्रता

१२ वी उत्तीर्ण समकक्ष

६.शिक्षणक्रमाची संरचना

- श्रेयांक : १६
- अभ्यासतास : ५२० तास
- अभ्यासविषय :
    1. VEF 101 नैतिक सक्षमता
    2. VEF 102 सौंदर्य, ज्ञान, संक्रमण
    3. VEF 103 प्रात्याक्षिके
        - 3.1 प्रात्याक्षिके कार्य
        - 3.2 प्रोजेक्ट
        - 3.3 सैद्धांतिक भागांशी संबंधित प्रात्यक्षिके

७. शिक्षणक्रमाचा कालावधी

कमीत कमी १ वर्ष व जास्तीत जास्त २ वर्षात पूर्ण करणे अनिर्वाय राहील .

८. शिक्षणक्रमाचे माध्यम

इंग्रजी आणि मराठी

९. शिक्षणक्रम शुल्क

अ.क्र .	तपशील	शुल्क रु.
Part – A		
१.	परीक्षा शुल्क	३६०/-
२.	नोंदणी शुल्क	२००/-
३.	पात्रता शुल्क	१००/-
४.	गुणपत्रक शुल्क	१००/-
५.	ई- सुविधा	६०/-
६.	ओळखपत्र शुल्क	१०/-
७.	माहिती पुस्तिका शुल्क	५०/-
८.	विद्यार्थी सेवा शुल्क	१०/-
Part – B		
१.	शिक्षणक्रम शुल्क	६४०/-
२.	बहाई अकादमी शुल्क	१५३०/-
एकूण शुल्क		**३०६०/-**

१० अभ्यासक्रम

कृपया देलेल्या linkवर click करा.

https://bahaiacademyonline.com/

११. अध्ययन साहित्य

- ✓ E Materials (e books, Videos Word files, Links etc.)

१२. शिक्षणक्रम अंमलबजावणी प्रक्रिया

पायरी १: YCMOU पोर्टलवर प्रवेश (विद्यार्थ्यांद्वारे)

पायरी २: विद्यार्थ्यांना त्यांच्या ईमेलवर त्यांचे Username आणि पासवर्ड प्राप्त होतील (BALMS द्वारे)

पायरी ३: विद्यार्थ्यांनी सर्व सत्रे नियोजित वेळेत पूर्ण करावीत, तसेच खाली दिलेल्या वेळापत्रकानुसार त्याच्या सर्व शैक्षणिक कृती, स्वाध्याय आणि प्रकल्प महिनावार पूर्ण करून ऑनलाईन सबमिट करणे अपेक्षित आहे.

टीप: BALMS वर मार्गदर्शक तत्त्वे असलेली **कोर्स हँडबुक** दिले जाईल. त्यामध्ये अभ्यासक्रम पूर्ण करण्यासंबंधीची प्रक्रिया आणि मार्गदर्शन, कृती यादी, प्रात्यक्षिक, स्वाध्याय आणि प्रकल्प याची मांडणी सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांनी BALMS मधून अपलोड केलेली **कोर्स हँडबुक** वाचून आपला शिक्षणक्रम पूर्ण करावा.

१३. मूल्यमापन पद्धती

क) सदर शिक्षणक्रमाची दोन अभ्यासविषयांची प्रत्येकी ७० गुण याप्रमाणे १४० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.

ख) प्रात्यक्षिकासाठी १०० गुणांचे कार्य असेल.

ग) सामुदायिक प्रकल्पाचा अहवाल लेखनासाठी १०० गुण असतील.

घ) मौखिक परीक्षेसाठी ५० गुण असतील.

ङ) आंतरवासिता / क्षेत्रीय कार्यासाठी ५० गुणांचे कार्य असेल.

अ.क्र.	अभ्यासक्रमाचे नाव	अंतर्गत मूल्यमापन	अंतिम परीक्षा	एकूण गुण
१.	सैद्धांतिक विषय १ VEF 101 नैतिक सक्षमता	३०	७०	१००
२.	सैद्धांतिक विषय २ VEF 102 सौंदर्य, ज्ञान, संक्रमण	३०	७०	१००
३.	प्रात्याक्षिक VEF 103	१००	००	१००
४.	प्रकल्प अहवाल लेखन	१००	००	१००
५.	मौखिक परीक्षा (Viva-Voce)	५०	००	५०
६.	आंतरवासिता/ क्षेत्रीय कार्य	५०	००	५०
	एकूण गुण	**३६०**	**१४०**	**५००**


१४. उत्तीर्णतेचे नियम

अंतिम लेखी परीक्षा, प्रात्यक्षिक, अहवाल लेखन, मौखिक परीक्षा आणि आंतरवासिता/ क्षेत्रिय कार्य यामध्ये प्रत्येकी ४०% गुण संपादन करणे आवश्यक राहील.

१५. शिक्षणक्रम कॅलेंडर

- जानेवारी 2025: विद्यापीठ पोर्टलवर प्रवेश आणि LMS वर नोंदणी
- फेब्रुवारी-मार्च 2025: मॉड्यूल 1
- एप्रिल-मे 2025: मॉड्यूल 2
- जून-जुलै 2025: समुदाय प्रकल्प/इंटर्नशिप
- ऑगस्ट 2025: असाइनमेंट, प्रॅक्टिकल आणि प्रकल्प सबमिट करणे
- सप्टेंबर 2025: ऑनलाइन परीक्षा
- ऑक्टोबर 2025: ऑनलाइन तोंडी परीक्षा
- नोव्हेंबर 2025: मूल्यमापन आणि मूल्यांकन
- डिसेंबर 2025: निकालांची घोषणा आणि नवीन बॅचसाठी जाहिरात

१६. प्लॅटफॉर्म



१७. अधिक माहितीसाठी संपर्क

१. माहितीपुस्तिका, प्रवेश अर्ज, विद्यार्थी सहाय्यता केंद्र अडचणी

- संचालक, विद्यार्थी सेवा विभाग, नाशिक
- नोंदणी प्रमुख, नोंदणी कक्ष, नाशिक
- विभागीय संचालक, संबंधित विभागीय केंद्र

२. अभ्यासक्रम (विषय) यांतील अडचणी

- संचालक, स्कूल ऑफ ऑनलाईन लर्निंग : E-mail : dir_sol@ycmou.ac.in
- शिक्षणक्रम समन्वयक :
  डॉ. विद्यादेवी बागुल - मो. क्रं. : ९९७००५३८०६

E-mail : sol_coordinator1@ycmou.ac.in

डॉ. सचिन पोरे – मो. क्र. : ९०२१२४४५७७

E-mail : pctrc_coordinator2@ycmou.ac.in

३. नोंदणी, नोंदणी क्रमांक, पत्ताबदल, केंद्रबदल

- नोंदणी प्रमुख, नोंदणी कक्ष, नाशिक, दूरध्वनी (०२५३) २२३१४७५

  ई-मेल: nondani@ycmou.digitaluniversity.ac

४. परीक्षा, परीक्षा अर्ज, परीक्षा क्रमांक, निकाल, पदवी प्रमाणपत्र

- परीक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग, दूरध्वनी २२३०७१६ (०२५३)

  ई-मेल: coe@ycmou.digitaluniversity.ac

५. Bahai Academy Learning Management System

(BALMS), विषयासंदर्भात, क्रियाकलाप, प्रॅक्टिकल, असाइनमेंट आणि प्रकल्प या विषयी अडचण असल्यास

- बहाई अकादमी, पाचगणी – Helpline – ९३७०७०५४९३
- ई-मेल: vef@bahaiacademy.org